# लोकमान्य सांजवार्ता

पुणे, शुक्रवार ११ ऑक्टोबर २०१९ (दैनिक)


## सिटी इंटरनॅशनल स्कूल तर्फे स्वच्छता मोहीम

मुंबई (प्रतिनिधी) : पंतप्रधान श्री . नरेंद्र मोदी यांनी २९ ऑगस्टपासून सुरू केलेल्या फिंट इंडिया अभियान अंतर्गत देशभरातील अनेक शाळांनी सहभागी होऊन विविध उपक्रम राबविले आहेत . त्याचाच एक भाग म्हणून सातारा रस्ता येथील सिटी इंटरनॅशनल स्कूल तर्फे स्वच्छता मोहीम राबविण्यात आली . त्यातून विद्यार्थ्यांनी स्वस्थ भारत , स्वच्छ भारत चा संदेश दिला .

शाळेपासून सुरू झालेल्या या मोहीमे अंतर्गत विद्यार्थ्यांबरोबर शिक्षक सहभागी झाले होते . २ किलोमीटर अंतरापर्यंत शाळेच्या परिसरातील कचरा , प्लास्टीक तसेच प्रदूषण करणा-या अन्य वस्तू गोळा करण्यात आल्या . यावेळी विद्यार्थ्यांनी स्वच्छतेचा संदेश देणारी बॅनर्स आणि पोस्टर्स द्वारे स्वच्छतेचा संदेश दिला तसेच नागरिकांना पर्यावरण पूरक पेपर बॅग दिल्या . प्लास्टीक ला हद्दपार करण्याचा संदेश देण्यात आला . विद्यार्थ्यांनी भरविलेले प्रदर्शन आणि जनजागृती या द्वारे स्वास्थ आणि स्वच्छ्ता या दोन्हींचा संदेश देण्यात आला .